**नि. फौ. ख. क्र.८८/२०२०**
**सरकार विरुध्द लक्ष्मण व ईतर**
**निशाणी क्र.४५**

**अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्रमांक ०६**
मी शपथेवर निवेदन करतो की,

| | |
|---|---|
| नाव– | **शेख शादुल महेबुब साब,** |
| वय– | **५५** वर्षे, धंदा– मिस्त्री, |
| रा. | **सायखेड, ता. धर्माबाद, जि. नांदेड.** |

**सरकारी वकील श्रीमती. सी. बी. काळे यांच्यामार्फत साक्षीदाराचा शपथेवर सरतपास सुरु.**

०१. मी आरोपींना ओळखतो. ते माझ्या गावातील आहेत. आरोपी आज न्यायालयात हजर आहेत. दिनांक ०१/०८/२०२० रोजी पोलीसांनी मला घटनास्थळ पंचनामा करण्यासाठी कोठेही बोलावले नाही. त्यादिवशी पोलीसांनी माझया समक्ष पंचनामा केला नाही. आता मला एक घटनास्थळ पंचनामा दाखवला. त्यावर माझी सही नाही. त्यातील मजकुर मला माहिती नाही.

**{साक्षीदार अभियोग पक्षास सहाय्य करीत नसल्याने त्याला सुचक स्वरुपाचे प्रश्न विचारण्याची परवानगी सहा. सरकारी वकील यांनी मागितली व परवानगी देण्यात आली.}**

०२. हे म्हणणे खरे नाही की, दिनांक ०१/०८/२०२० रोजी पोलीसांनी मला घटनास्थळ पंचनामा करण्यासाठी मौजे सायखेड येथे फिर्यादी देविदास डुमणे यांच्या घरी पंच म्हणुन बोलावले होते व मी तेथे गेलो होतो. हे म्हणणे खरे नाही की, फिर्यादीने आम्हाला घटनास्थळ दाखवले. हे म्हणणे खरे नाही की, पोलीसांनी घटनास्थळाची पाहणी केली व माझया समक्ष घटनास्थळ पंचनामा तयार केला. हे म्हणणे खरे नाही की, तो पंचनामा पोलीसांनी मला वाचुन दाखवला त्यानंतर मी त्यावर सही केली आहे. हे म्हणणे खरे नाही की, आरोपींना वाचवण्याकरिता व त्यांना शिक्षा होऊ नये म्हणुन मी आज रोजी खोटी साक्ष दिली आहे.

**सरतपास–पुर्ण**

**आरोपीचे विधीज्ञ श्री. के. एम. आढाव यांनी उलटतपास नाकारला.**

**फेरतपास नाही.**
दिनांक १८/०३/२०२६

| | |
|---|---|
| वा.दा.ब.अ.क.केले. | श्रवणोत्तर स्वीकृती, |
| सही/– | सही/– |
| (एस.एम.कोळेकर) | (एस.एम.कोळेकर) |
| प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी, धर्माबाद. | प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी, धर्माबाद. |